ORIGINAL ARTICLE

ISSN:- 2231-5063

Golden Research Thoughts



*रमाकांत तिडके*

विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण, जि. औरंगाबाद.

*सारांश :*

भारतीय समाजातील स्त्रियांना प्राचीन काळापासूनच अत्यंत दुय्यम स्थान मिळालेले होते. याचे प्रत्यंत्तर आपणास अनेक अनिष्ट प्रथांतून येते. सतीप्रथा, बालविवाह, आंतरजातीय विवाहबंदी, विधवा विवाहबंदी, केषवपन अशा अनेक अनिष्ट प्रथा अस्तित्वात होत्या. अगदी प्रारंभापासूनच पुरुषाने स्त्रीवर प्रभुत्व मिळवून कुटुंब व समाज जीवनात स्त्रीचे स्थान कनिष्ठ बनविले होते. पूर्व वैदिक कालखंड, उपनिषदांचा कालखंड अशा काही कालखंडाचा अपवाद सोडल्यास इतर सर्वच कालखंडामध्ये भारतीय स्त्रियांची दयनीय अवस्था असल्याचे दिसून येते. त्यातील स्मृती कालखंडात तर स्त्रियांची फारच दुर्दषा झालेली दिसते. यात प्रामुख्याने मनुस्मृतीचा फार मोठा प्रभाव तत्कालीन जनसामान्यांवर व समाज व्यवस्थेवर तर होताच. पण पुढील बरीच शतके तो तसाच टिकून राहिला. उपलब्ध मनुस्मृती स्वायंभू व मनुच्या सुचनेवरून त्याचा शिष्य भृगू ऋषीने निवेदन केलेली असून यामध्ये १२ अध्याय व २६९४ श्लोक आहेत.

# मनुस्मृती या ग्रंथातील स्त्रीविरोधी विचारांमुळे भारतीय स्त्रियांची झालेली दुर्दषा



### प्रस्तावनाः–

मनुस्मृती ही संहिता म्हणून सर्वात मोठी व सर्वात प्राचीन (बहुतांश विचारवंतांच्या मते इ.स. पूर्व ३०० ते इ.स. पूर्व २००) असल्याचे दिसून येते. स्त्रियांची दुर्दषा का, कषी व कोणामुळे झाली याचा शोध घेतल्यास लक्षात येते की, या दुर्दषेचे मूळ धर्मशास्त्राचा आविष्कार करणाऱ्या मनुस्मृतीमध्ये आहे. त्यामुळे मनुस्मृतीचा बारकाईने अभ्यास करणे अपरिहार्य ठरते.

### स्त्री जन्माचा तिरस्कार –

भारतीय समाजात मुलीचा जन्म दुर्भाग्याचा वाटतो. पहिली मुलगी झाली की, घरातील लोकांचा चेहरा हिरमुसतो. पाठोपाठ दुसरी, तिसरी मुलगी झाली की, चिडचिड, शिव्याशाप सुरु होतात. मुलगी होणे म्हणजे पाप समजले जाते. याचे मूळ मनुस्मृतीत दिसून येते. मुलगा म्हणजे पुत्र का म्हटले जाते तर "पुम्" नामक नकरापासून तो पितरांचे (माता-पित्यांचे) रक्षण करतो. (मनुस्मृती अध्याय ९/श्लोक १३८). पुत्रांमुळे स्वर्ग लोकांची प्राप्ती होते. प्रौत्रामुळे (नातवामुळे) चिरकालता व प्रप्रौत्रामुळे (पणतूमुळे) सूर्यलोक प्राप्त होतो.

पुत्रेण लोकात्रजयजी प्रौत्रेणानन्त्यमश्नुते !
अथ पुत्रस्त प्रौत्रेण ब्रहनस्याप्नोति विष्ठपम !! (मनु. अ. ९/श्लोक १३७)

पुत्राचे महत्व अशा रीतीने सांगितल्यामुळे साहजिकच पुत्रप्राप्तीचे वेध संपूर्ण भारतीय समाजाला लागलेले होते. राजस्थानात मुलगी झाल्यावर तिला रीतसर भाऊ किंवा बापाकडून ठार मारुन नष्ट केले जात असे. पुत्रवती आईला ग्रामीण समाजात अतिशय महत्व होते. त्यामुळे आपोआपच कन्या जन्माचा तिरस्कार समाजात निर्माण झालेला होता.

मनुला नीतिमत्तेचा आग्रह फार दिसतो. पण सर्व व्याभिचारी पुरुषांना ठार करावे असे तो म्हणत नाही. परंतु कोणत्याही वर्णाची व्याभिचारिणी स्त्री मात्र ठार करावी व त्यामुळे होणाऱ्या हत्येच्या पापक्षालनासाठी आपापल्या वर्गानुसार घोडयाचे जीन, धनुष्य, बकरा, मेंढा दान करावा म्हणजे हत्येच्या पापातून सुटका होते. मनु मनुष्यहत्येकडे क्षुल्लक म्हणून पाहत नाही. मनुष्य जीवनाचे महत्व मनू मान्य करतो. तो फक्त स्त्रीचे महत्व मान्य करीत नाही. स्त्रीची किंमत घोडयाचे जीन, धनुष्य, बकरा, मेंढा यांच्या इतकी आहे असे त्याचे म्हणणे होते. मनुने स्त्रीची तुलना निर्जीव वस्तू व जनावराबरोबर करुन पुरुषाला श्रेष्ठ तर स्त्रीला गौण स्थान दिलेले होते.

### स्त्री शिक्षणास मनाई –

स्त्रियांच्या शिक्षणाविषयी मनुची भूमिका संकुचित व नकारात्मक वाटते. शिक्षण घेण्याअगोदर मुलांना उपनयन विधीचा संस्कार महत्वाचा मानलेला होता. परंतु स्त्रीच्या बाबतीत या संस्कारास मनाई करण्यात आलेली होती. पर्यायाने अध्ययनास मनाई करण्यात आलेली होती. मनुपूर्वी स्त्रियांनासुध्दा उपनयन संस्कार सांगितला जात असे. परंतु मनुच्या स्मृतीतून हे बाद झालेले दिसते.

नास्ति स्त्रीणां क्रिया मंत्रौरिति धर्मो व्यवस्थितः !
निरिन्द्रिया व्यमन्त्राष्च स्त्रियो नृतमिती ऽ स्थितीः !! (मनु. ९/१८)

(स्त्रिांवर वैदिक मंत्रांनी संस्कार केले जाऊ नयेत असे धर्मात सांगितलेले आहे. मंत्ररहित असल्यामुळे श्रृती स्मृती इत्यादींचा अधिकार त्यांना नाही. कारण त्या निरिन्द्रिय - ज्ञान ग्रहण करणाऱ्या इंद्रियांनी रहित असतात. त्यामुळे त्या असत्यासम असतात) एक विवाहाचा अपवाद सोडून त्यांच्यावर वैदिक मंत्रसंस्कार बंदी घालण्यात आलेली होती.

स्त्रियांना अध्ययनाचा अधिकार मनुने अषा पध्दतीने नाकारल्यामुळे व त्या असत्य असल्याचे धर्म सांगतो असे विवेचन केल्यामुळे धर्माच्या धाकाने स्त्रियांचे षिक्षण समाजाने निषिध्द ठरविले होते. याचा परिणाम भारतात सर्वदूर झाला. महाराष्ट्रात महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतल्यावर व पुढे अनेक कार्यकर्त्यांनी त्यात भर घातल्यामुळे स्त्रिया बऱ्याच सुशिक्षित झालेल्या दिसतात. शुद्रवर्णियांमध्ये तर स्त्रियाच काय पण पुरुषांनाही शिक्षणास बंदी होती. उच्चवर्णीय स्त्रियांच्या शिक्षणास पुरुषांनी प्रारंभी विरोध पण नंतर अनुकूलता दर्शविल्यामुळे या स्त्रिया विद्याविभूषित झाल्याचे दिसून येते.

### विवाह : स्त्रियांसाठी आवश्यक संस्कार बंधन –

"विवाह" हा एकच संस्कार तो ही आवश्यक बंधन स्वरुपात मनुने स्त्रियांसाठी सांगितला होता (मनु. २/६७). या संस्काराची उपनयन विधीशी तुलना करून वेदाध्ययनासाठी विद्यार्थ्याला जे आचरण करावे लागते ते विवाहित स्त्रियांना कशा प्रकारे करावे लागते हे सांगितले होते. पतीची सेवा करणे म्हणजेच गुरुकुलात वास करणे आणि घरचे काम करणे म्हणजेच अग्निहोम कर्म समजले जात असे. अशा प्रकारे विवाह धार्मिक संस्कार स्त्रियांच्या बाबतीत बंधन रुपात सांगितल्यामुळे भारतीय समाजात मुलीचा विवाह करणे बाध्य झालेले होते व आई-वडिलांचे ते

एक आवष्यक कर्तव्य ठरलेले होते. विशेषत: ग्रामीण समाजात तर स्त्रीने अविवाहीत राहण्याची कल्पनाच असह्य ठरत असे. स्त्री ही अपत्य प्राप्तीचे एक साधन होती व अपत्य वाढविणे हे तिचे प्रमुख काम आहे (मनु. ९/२७). पुरुषांना अविवाहित राहता येत असे. परंतु मुलीचा विवाह भारतीय समाजात आवश्यक मानला गेला होता. केरळमध्ये अविवाहित स्त्रिया वारल्या तर सजातीय वराषी प्रेताचे लग्न लावून नंतरच त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येत असत.

मनुस्मृती कालखंडापूर्वी मुलींच्या विवाहाची मर्यादा १६ वर्षे होती. ती मनुने आठवर आणली होती. तीस वर्षांच्या वराने चोवीस किंवा आठ वर्षांच्या मुलीबरोबर विवाह करावा असे म्हटले होते (मनु. ९/९४). विषम वयाची शिफारस मनुने ज्या ढंगाने केली तो ढंग पुरुषी वर्चस्वाचा व स्त्रीला गुलाम करणारा होता. पतीचे तिप्पट वय झाले तरी पत्नीने केवळ मायबापाने दिले म्हणून त्याला देव म्हणून स्वीकारावे (मनु. ५/१५४). तो रोगी, दुष्चरित्र, नपुंसक, दुर्गुणी असला तरी स्त्रीने त्याला देव मानून त्याची सेवा करावी. तिने वेगळी व्रतवैकल्ये करु नयेत फक्त पतीची सेवा करावी (मनु. ५/१५५) अषी सक्ती स्त्रियांवर होती. मनुनिर्मित कायद्यात मनुने स्त्रियांवर लैंगिक गुलामगिरी लादलेली होती. दुराचारी, वेडा, नपुंसक, पापरोगी कषाही पतीची सेवा पत्नी जर करत नसेल व त्याला सोडून देत असेल तर तिला मनुने विविध दंड व शिक्षा सांगितलेल्या होत्या (मनु. ९/७७ व ७८). पण तीच जर का पत्नी चरित्रहीन, दारू पिणारी, रोगी, पतीच्या विरुध्द वागणारी असेल तर पतीने दुसरा विवाह करावा (मनु. ९/८१) असे सांगितलेले होते.

### *स्त्रीची वैधव्य अवस्था –*

मनुच्या मते स्वाध्वी स्त्रियांना दुसरा पती नसतो (मनु. ५/१६२). विविध विधीत विधवांच्या पुनर्विवाहासंबंधी एकही वाक्य दिलेले नाही (मनु. ९/६५). यावरून मनुला पुनर्विवाह मान्य नव्हता असे दिसते. पुनर्विवाहाच्या बाबतीत जे मुद्दे पुरुषाच्या बाबतीत ग्राह्य धरले जातात ते स्त्रियांच्या बाबतीत ग्राह्य धरले जात नव्हते. दुसऱ्या स्त्रीषी विवाह केल्यामुळे एखादी स्त्री विटून निघून जात असेल तर तिला रोखण्याचा प्रयत्न करावा किंवा तिचा त्याग करावा (मनु. ९/८३). यावरून पुरुष दुसरा विवाह सहज करु शकत असे परंतु स्त्रीला मात्र पुनर्विवाहाची अनुमती नव्हती. स्त्री पती निधनानंतर विधवा होते. तिने कंदमुळे खात आपले शरीर क्षीण करावे. पर पुरुषाचा विचारही न करता पतिव्रताने, ब्रह्मचर्यव्रताने जगावे (मनु. ५/१५७) असे मनुस्मृतीत म्हटलेले होते. याउलट पुरुषांना मात्र पत्नी मृत झाल्यानंतर तिचा अंत्यसंस्कार झाल्याबरोबर विवाह करता येत असे (मनु. ५/१६८). मनुने सतीच्या प्रथेचा उल्लेख मात्र केलेला दिसून येत नाही.

### *मनुला दिसलेले स्त्रियांचे दोष –*

मनुस्मृतीमध्ये स्त्रियांना अनेक दूषणे दिलेली दिसून येतात. मनुच्या मते, स्त्रिया झोपाळू असतात, सतत बसून राहतात, त्यांना दागिन्यांची आवड असते, कामभावना, क्रोधभावना, उध्दटपणा, द्रोह करण्याची वृत्ती व दुराचार इ. स्त्रियांचे दुर्गुण असतात (मनु. ९/१७). मद्यपान करणे, दुर्जन संसर्ग, पतीच्या अनुपस्थितीत फिरणे, अवेळी झोपणे, दुसऱ्याच्या घरात राहणे इ. दूषणे मनुने स्त्रियांना दिलेली होती (मनु ९/१३). कोणत्याही वर्णातील स्त्री असो मनूला स्त्रीचे दास्य अभिप्रेत होते. पुरुषांना दूषित करणे, म्हणजे पवित्र असणाऱ्या पुरुषांच्या ठिकाणी अपवित्रता व दोष निर्माण करणे हा स्त्रियांचा स्वभावच असतो (मनु. २/२१३). पुरुष विद्वान असो की अविद्वान त्याला बिघडविण्याचे सामर्थ्य स्त्रीमध्ये असते (मनु. २/११४). आई, बहीण, मुलगी कुणीही असो पुरुषाने त्यांच्यासोबत एकांतात बसू अगर बोलू नये (मनु. २/२१५). मनुच्या मते स्त्रिया चटकन व्यभिचारी होणाऱ्या आणि चंचल मनाच्या असतात (मनु. ९/१५). परंतु श्रेष्ठ पुरुषांच्या संयोगाने स्त्री श्रेष्ठ होते (मनु. ९/२३). अषा प्रकारे मनुने स्त्रियांना विविध दूषणे देत पुरुषांच्या तुलनेत गौण मानलेले दिसते.

### *स्त्रीचे पारतंत्र्य –*

मनुने स्त्रियांना मुक्या जनावराप्रमाणे बांधलेले ठेवावे अशी समाजाची धारणा करून दिली होती. त्या गुलामाहुन गुलाम आहेत, त्यांना पुरुषांनी आपल्याच ताब्यात ठेवावे असा समज करून दिल्यामुळे समाजात स्त्रियांना तषीच वागणूक देण्यात येत होती.

अस्वतन्त्र स्त्रिय: कार्या: पुरुषै: स्वैर्दिवानिषम !
विषयेषुच सज्जन्त्य: संस्थाप्यात्मनो वषे !! (मनु. ९/२)

पुरुषांनी कोणकोणत्या नात्यांनी स्त्रीचे रक्षण करावे हे सांगून मनुने स्त्री हे स्वातंत्र्यास पात्र नसते हेही सांगितलेले होते.

पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने !
रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति !! (मनु. ९/३)

स्त्री कोणत्याही वयाची असो, घरातील कोणतेही काम करण्याचे स्वातंत्र्य तिला देण्यात येऊ नये. लहानपणी पित्याने, तारुण्यात पतीने आणि पती निधनानंतर पुत्राने तिला आपल्या ताब्यात ठेवावे, परंतु तिला स्वातंत्र्य देऊ नये,

मनुस्मृतीच्या ५ व्या अध्यायातील १४७ ते १४९ मध्ये असेही म्हटलेले होते की, स्त्रीने स्वतंत्रपणे घरातील कोणतेही काम करू नये. ते घरातील वडील मंडळीच्या सहमतीनेच करावे. तिने पित्याच्या, पतीच्या किंवा पुत्राच्या आधरानेच राहावे. स्वतंत्रपणे एकटीने राहण्याची इच्छा कधीही करू नये. त्यामुळे सासर व माहेर ही दोन्ही कुळे निंदेस पात्र होतात. तिने आनंदी राहावे, गृहदक्षता बाळगावी, आपल्या मनाने घरखर्च करू नये अशी निरनिराळी बंधने लादून तिचे स्वातंत्र्य कुंठित केलेले होते.

स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्यही नष्ट केलेले होते. तिला खर्चासाठी पुरुषावर अवलंबून राहावे लागत असे. पुत्राप्रमाणे कन्येला वारसा दिलेला नव्हता व दासाप्रमाणे धनहीन मानलेले होते. त्यांच्याकडे भेट व बक्षीस रूपाने जे धन आलेले असेल त्यावरही त्यांच्या धन्याची म्हणजेच पुरुषांची सत्ता असे (मनु. ८/४०१ व ४१६). तेव्हा स्वतंत्रपणे धन कमावण्याचा अधिकार तर सोडाच पण प्राप्त धन किंवा माहेरहून आलेले स्त्रीधन हेही पतीच्या आज्ञेषिवाय साठवता अगर खर्च करण्याचा अधिकार तिला नव्हता असे दिसते.

मनु अनेकदा स्त्रियांचा व शूद्रांचा एकत्र उल्लेख करतो (मनु. ४/१३९). कधी स्त्रियांचा व जनावरांचा एकत्र उल्लेख करतो (मनु. ५/१३०). पिता किंवा त्यांच्या संमतीने वडील भाऊ स्त्रीला ज्या पुरुषाच्या ताब्यात देईल त्याच्या ताब्यात तिने राहावे व त्याची जन्मभर सेवा करावी (मनु. ५/१५१). पती शीलरहित, स्वेच्छाचारी असला तरी त्याला देव मानावे (मनु. ५/१५४). पती वारला तरी त्याची इच्छा मोडू नये, आमरण व्रतस्थ राहावे. परपुरुषाची इच्छा करू नये (मनु. ५/१५८). पुरुषांनी मात्र पत्नी वारल्यास नव्याने गृहस्थाश्रम पुढे चालू राहावा यासाठी पुन: लग्न करावे (मनु. ५/१६८). स्त्रीला नव्याने पती करण्याचा अधिकार नाही (मनु. ५/१६२). स्त्री स्वतंत्र नाही, तिने नेहमी पुरुषाच्या अधीन राहावे (मनु. ९/२). स्त्रीला तिच्या पतीने घरात जरी कोंडून ठेवले तरी ते तिचे संरक्षणच आहे (मनु. ९/१२). अशा प्रकारची अनेक बंधने स्त्रीवर टाकून मनूने तिला बंदिस्त करून ठेवले होते.

स्त्रीने वाममार्गाला जाऊ नये या नावाखाली मनुने तिला अनेक कामांत गुंतवून ठेवल्याचे दिसते. मनूच्या मते, स्त्रिया जर विषयोपभोगात आसक्त होत असतील तर त्यांना अंकित व सत्तेखाली ठेवणे हे पती व कुटुंबातील इतर पुरुषांचे पहिले कर्तव्य असते. स्त्रियांचे कुमार्गापासून संरक्षण त्यांना कोंडून ठेवून शक्य होत नसेल तर पतीच्या उत्पन्नाचा हिशेब ठेवणे, घराची शोभा व स्वच्छता राखणे, स्वयंपाक करणे इत्यादी कामांत गुंतवून त्यांचे संरक्षण करणे शक्य असते. याषिवाय आपल्या पत्नीला कुमार्गापासून परावृत्त करण्याकरिता तिला मृत्युदंडसुध्दा करण्याचे काही अधिकार पुरुषांना होते.

### *स्त्री निंदा –*

स्त्री एक मानवी व्यक्ती आहे. तिलाही मानवी मन, शरीर, भावना, वासना आहेत हे मनुने कधीच लक्षात घेतलेले दिसत नाही असे मनुस्मृतीतील पुढील श्लोकावरून लक्षात येते.

नैतां रुपं परीक्षन्ते नासां वयसि संस्थिति: !
सुरुपं वा विरुपं वा पुमानित्येव भुत्रजते !!
पौश्चल्याच्चला चित्ताच्च नैस्नेह्याच्च स्वभावत: !
रक्षिता यत्नतो ऽ पीह भर्तृष्वेता विकुर्वते !! (मनु. ९/१४ व १५)

(स्त्रियां रूप पाहत नाही की वय, पुरुषाला पाहून, तो सुरूप असो की कुरूप त्यावर त्या भाळतात. परपुरुषाला पाहून संभोगाची इच्छा करणाऱ्या, चंचलचित असलेल्या या स्त्रिया जात्याच निष्प्रेम असतात. कितीही प्रयत्नपूर्वक त्यांचे रक्षण केले तरीही त्या पतीच्या बाबतीत वाईट आचरण करतातच). स्त्री दूषणाचे आकडे बघितले व बलात्कारांचे प्रमाण लक्षात घेतले तर नात्यातील पुरुषच स्त्रीला दूषित करताना दिसतात. परंतु मनुने मात्र पुरुषांना स्त्रीच बिघडविते असे जाहीर करून टाकले होते. सहज शृंगार चेष्टेने पुरुषांना मोहीत करून दूषित करणे ही स्त्रियांची स्वाभाविक प्रवृत्ती असते. त्यामुळे विद्वानानेसुध्दा तरुण स्त्रियांच्या बाबतीत सावधानी राहिले पाहिजे असे मनूचे मत होते. अषा प्रकारची मनुस्मृतीतील स्त्रीनिंदा फक्त मानवजातीत असणारा कामवासनेचा प्रवाह थोपवावा आणि माणूस नीतिमान करावा यासाठी होती अषी समर्थन करणारी मंडळी अतिशय बेजबाबदारपणे अर्ध्या मानव जातीच्या गुलामगिरीचे समर्थन करीत असतात.

### *स्त्रियांबद्दचा आदर –*

एवढी स्त्रीनिंदा व स्त्रियांची दास्यता प्रतिपादन करून झाल्यानंतर मनु स्त्रियांच्या कौतुकाचे व आदराचे काही शब्दही वापरतो. जिथे नारी पूजली जाते तिथे देव रमतात. यत्र नार्यस्तू पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता: (मनु. ३/५६). असे मनु सांगतो, स्त्री ही दुष्कुळातली असली तरी ते रत्नच मानावे असेही मनुचे मत होते. पण या मताचा अर्थ इतकाच होतो की, देखणी स्त्री उपभोगासाठी स्वीकारताना भोग सुख पाहावा, तिच्या कुळाचा विचार करू नये. अन्नवस्त्रांच्या मोबदल्यात प्रजोत्पादन व सेवा यांचे एक साधन म्हणून स्त्री होती. स्त्रीला कषाही रीतीने खुश ठेवावे. कारण त्या खुश राहिल्या तर घरात समृध्दी, सुबत्ता येते. खुषीमुळे त्या घरात अधिक काम करतात. त्यांचा सन्मान केल्याने त्या पुरुषांचे काम जातीने लक्ष घालून करतील. त्यांच्या शहाणपणासाठी त्यांचा सन्मान करावा असे म्हटलेले नव्हते. पुरुषांच्या कल्याणासाठी म्हणून त्यांना मान, सन्मान देऊन भूषित करावे (मनु. ३/५५) असे म्हटलेले होते. स्त्रियांच्या कल्याणासाठी त्यांना भूषित करावे असे कोठेही म्हटलेले नव्हते. या ठिकाणी स्पष्टपणे पुरुषांच्या स्वार्थासाठी स्त्रियांना वस्त्र, दागिन्यांची भूल दिली जावी पण माध्यम सन्मानाचे असावे असाच अर्थ यातून ध्वनित होतो.

मातेबद्दल आदर व्यक्त करणारे, माता पित्याहून सहस्त्र पटीने पूज्य आहे (मनु. २/१४५). या अर्थाचे एक विधान मनुस्मृतीमध्ये आलेले आहे. हे विधान, स्त्री पतीची ताबेदार व तो नसल्यास पुत्राची ताबेदार असते, या विधानाशेजारी ठेवून पाहिल्यास मनुची खरी भूमिका लक्षात येते. मनु स्त्रियांना रत्न म्हणतो व रत्नाचा संग्रह कुठूनही करावा हे सांगतो (मनु. २/२४०). हा धडधडीत भोगवादाचा सल्ला होता. मनु वासनांचे नियंत्रण करीत नाही तर पुरुषांच्या दायित्वहीन भोगाला अतिशय गोड शब्दांत वाट करून देतो. स्त्रिया रूप, तारुण्य वगैरे काही न पाहता केवळ पुरुष आहे म्हणून त्याच्याकडे आकर्षित होतात (मनु. ९/१४). हे सांगितल्यावर पुनः स्त्रीचे मोठेपण मनुने सांगावे याला काहीच अर्थ उरत नाही. मनुने शुद्रातिशुद्रांचा अवमान, अवहेलना करणारे खूप लिहिले परंतु तो स्त्री जातीची तेवढीच अवहेलना व उपमर्द करतो हेही विसरता येणार नाही आणि म्हणूनच अशा शुद्रातिशुद्रांचे आणि स्त्रियांचे स्वातंत्र्य नाकारणाऱ्या या ग्रंथाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९३५ रोजी रायगडाच्या पायथ्याशी (महाड) दहन करून पुढे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी या देशाला नवीन घटना प्रदान केली.

### संदर्भ ग्रंथ –


१.गोटे-गव्हाणे शुभांगी (संपा.), स्त्री परिवर्तनाची आव्हाने, प्रा. नलिनी सोमकुंवर यांचा “मनुस्मृतीतील स्त्रीविषय दृष्टिकोन व आजचा भारतीय समाज” हा लेख साऊथ एशियन, सोशल रिसर्च पब्लिकेशन, औरंगाबाद, २००३.

२)कुरुंदकर नरहर, मनुस्मृती, इंद्रायणी साहित्य, पुणे, १९९२.

३.Kane Pandurang Vaman, History of Dharma Shashtra Vol. II, Part-I, Bhandarkar Oriental Research Institute, Poona, 1941.